Impact Factor – 6.261

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH
FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

August -2018
SPECIAL ISSUE- LXII(A)

**Guest Editor**
Dr. Dinesh W. Nich[illegible]
Dr.Sanjay J. Kothari
Dr. Shubhangi Dane[illegible]

**Chief Editor**
Dr.Dhanraj T.Dhangar

**Executive Editor**
Prof.Virag S.Gaw[illegible]

This Journal is Indexed In :
- University Grants Commission (UGC) Sr.No. 40705
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

85

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue : Samisha August 2018
UGC Approved No. 40705

# 'प्रभावी मागणी' जागर सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचा मार्ग

प्रा. गजेंद्र बा. शेंडे.
लोकमान्य महाविद्यालय वरोरा. जि.चंद्रपूर ४४२९०७

भारतातील १२१ कोटी लोकसंख्येपैकी (२०११ च्या जनगणनेनुसार) ६८.८४% लोकसंख्या ग्रामीण भागात निवास करते. कृषी क्षेत्राचा वाटा एकूण घरगुती उत्पादनामध्ये कमी होत असला तरी शेतीवर आधारीत लोकसंख्येकरीता व शेती आधारीत उद्योगातील रोजगार वृध्दीसाठी आणि देशातील अन्नसुरक्षिततेसाठी कृषी क्षेत्राच्या कामगिरीत सुधारणा होत जाणे आवश्यक आहे.तसेच अर्थव्यवस्थेच्या सार्वत्रिक वृध्दीदरावर शेती क्षेत्राचा परिणाम होतो. त्यामुळे अनुकुल हवामान, पुरेसा पाऊस, रोगमुक्त पिके, भरपूर उत्पादन व किफायतशीर भाव या घटकांचा मेळ शेती विकासासाठी आवश्यक आहे.

विकसीत देशातील एकूण घरगुती उत्पादनामध्ये कृषी क्षेत्राचा वाटा २% आहे. ही परिस्थिती भारतामध्ये हळूहळू निर्माण होतांना दिसत आहे, त्यामुळे अर्थव्यवस्थेचा फायदा होण्याऐवजी विविध संकटे यामार्फत निर्माण होईल.यासाठी आजच या क्षेत्रातील विविध संधीचा शोध घेणे आवश्यक आहे. पुढील प्रत्येक पंचवार्षिक योजनेमध्ये कृषी क्षेत्राला प्रमुख क्रम दिल्यास ग्रामीण परिसरातील प्रभावी मागणीत वाढ नक्की घडून येईल.

## संशोधनाची उदिष्टये

१) कृषी क्षेत्र, उद्योग क्षेत्र व सेवा क्षेत्रातील परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.
२) ६८.८४% ग्रामीण लोकसंख्येच्या प्रभावी मागणीचा ( सार्थक उपभोगात वाढ ) अभ्यास करणे.
३) सदकाळ हरित क्रांतीच्या दिर्घकालीन परिणामांचा अभ्यास करणे.
४) वास्तविक आर्थिक विकासासाठी शेती क्षेत्रही महत्वपूर्ण आहे. याचा अभ्यास करणे.
५) ग्रामीण लोकांची अंतिम कार्यक्षमता व प्रत्यक्ष कार्यक्षमतामधील फरक नष्ट करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

## संशोधनाची गृहीते

१) ग्रामीण भारताची अर्थव्यवस्था ही आजही शेतीवर आधारीत आहे.
२) ग्रामीण अर्थव्यवस्थेतील प्रत्येक दोष दुर करता येते.

अविकसीत राष्ट्रांनी एकदम औद्योगिकरणाच्या मागे न लागता प्रथम शेतीचा विचार केला पाहिजे. तरच त्यांचे प्रश्न सुटू शकतील. भारतात दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून शेतीची उपेक्षा करून पाश्चात्य पध्दतीच्या औद्योगीकरणावर भर देऊन आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे महागाई, दारीद्रय, आर्थिक विषमता, बेकारी अशा लक्षणीय समस्या निर्माण झाल्या आहे आणि या सर्व समस्या सोडविण्यासाठी आपण उद्योग व सेवा क्षेत्राकडून अपेक्षा करीत चाललो आहे. हे खरे असले तरी शेती क्षेत्राची गुणकप्रभाव जादू ओळखणे आवश्यक आहे.

## पी.एल. –४८० चे विस्मरण होता कामा नये

१९६५ भारत – पाक युध्दात गव्हाने भरलेली जहाजे अमेरिकेने परत बोलवली होती यावर शास्त्रीजीनी बाणेदारपणे ओरिकेचा दौरा रद्द करून टाकला. अन्नधान्याच्या मदतीची गरज नाही असे अमेरिकेला ठामपणे सांगीतले. ही घटना पूर्णपणे विसरणे कठीण आहे. अन्नधान्याच्या प्रश्न पुढे वाढत्या लोकसंख्येमूळे उत्पन्न होणारा आहे. अन्नासाठी स्वातंत्र्य धोक्यात जाऊ शकते या कारणामुळेच १९६६–६७ मध्ये हरितक्रांतीचा प्रयोग झाला तो यशस्वी झाला असला तरी ''सदकाळ हरितक्रांती'' भारतीय अर्थव्यवस्थेतील लोकसंख्येसाठी आवश्यक आहे. हळूहळू पर्याप्त लोकसंख्या निर्माण झाल्यास सदकाळ हरितक्रांती पर्याप्त लोकसंख्येवर वरचढ होऊन कृषी

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) - 0.676 (2013) Special Issue : Samisha August 2018
UGC Approved No. 40705

क्षेत्रासाठी ही मोठी उपलब्धी होणार आहे. या उपलब्धीसाठी ग्रामीण -- कृषी क्षेत्रातील शेतकऱ्यांना व शेतमजुरांना जागृत करणे आवश्यक आहे.

ग्रामीण ग्राहकांची प्रभावी मागणी –

औद्योगिकरण विस्तृत आणि भक्कम करीत असतांना कृषी विकास मजबूत करावे लागते, कारण कोणत्याही क्षेत्राचा विकास ग्राहकांच्या प्रभावी मागणीवर (Effective Demand) अवलंबून असतो. कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या जास्त असल्यामूळे प्रभावी मागणीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. औद्योगीकरणामुळे कृषी क्षेत्रातील अतिरिक्त श्रमिक औद्योगीक क्षेत्रात जाऊ लागले असले तरी औद्योगीक क्षेत्रात अकुशल कामगारांना समावुन घेण्याची क्षमता नसल्यामुळे कृषी क्षेत्रातील अशाही लोकांचा विचार प्रभावी मागणीचा विचार करतांना करावा लागतो.

छुपी बेकारी व अकुशल कामगारांच्या प्रभावी मागणीत वाढ करण्याकरीता सरकारने विविध उपाय वापरने गरजेचे आहे, कारण कृषी क्षेत्रातुन आज आणि उद्याला लागणाऱ्या विविध वस्तु मिळणाऱ्या आहे. कृषीतील प्रभावी मागणीमुळे (एका क्षेत्रातील प्रभावी मागणीमुळे दुसऱ्या क्षेत्रातील प्रभावी मागणी मोठी किंवा कमी होते) दुसऱ्या क्षेत्रातील प्रभावी मागणी मोठी बनणार आहे. सरकारने कृषी क्षेत्रातील कृषी आधारीत उद्योगांना नियोजनात मुख्य स्थान दिल्यास हा प्रभावी मागणीचा भाग मोठा होऊन पूढे देशाचा सर्वात्रिक वृध्दीदर गुणक पटीने वाढवण्यास निश्चितपणे मदत होईल.

सदकाळ हरितक्रांतीचे तत्व –

आपल्या शेतकऱ्यांच्या सर्व बाजूनी होणाऱ्या दुर्दशेला आपली संपूर्ण अर्थव्यवस्थाच जवाबदार आहे. भारतातील अर्थव्यवस्थेत बदल होत असतांना ''सरक्षणवादी धोरणाचा'' वापर करणे गरजेचे आहे. १९६६—६७ मध्ये निर्माण झालेली हरित क्रांती सर्वसमावेशक नाही. सीमांत शेतकरी वर्ग या हरितक्रांतीच्या फायद्यापासून वंचित होता. सदकाळ हरितक्रांतीत सीमांत शेतकऱ्यांना केंदीत करून कृषी विकास योजना आखणे गरजेचे आहे सुक्ष्म नियोजन, व्यवस्थापन, प्रशिक्षणामार्फत सीमांत शेतकरी विविध गोष्टी करू शकतो. सदकाळ हरितक्रांतीमुळे ग्रामीण स्वयंपूर्णता तयार करण्यास काहीही अडचण नाही.

सदकाळ हरितक्रांतीचे फायदे भारतीय शेतकऱ्यांपर्यंत पोहचले पाहिजेत परंतु त्याचबरोबर या प्रयोगांचे दुरगामी परिणामही तपासुन पाहणे गरजेचे आहे. सदकाळ हरितक्रांती जुन्या हरितक्रांतीपेक्षा सर्वोत्तम असावयास हवी. २१ व्या शतकात या सदाकाळ हरितक्रांतीला सुरूवात झाली आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही कारण सर्वसमावेशक विकासासाठी शाश्वत विकास असे घोषवाक्य ११ व्या आणि १२ व्या पंचवार्षिक योजनेत पाहायला मिळाले आहे. दिर्घकालीन फायद्याचा भाग असल्यामुळे अल्पकालीन फायदे यात कमी आहे. (सिमांत शेतकरी, जुन्या व नविन बियाणांचा मेळ, सुक्ष्म व्यवस्थापन ते व्यापक व्यवस्थापन या सारख्या घटकांचा सदकाळ हरितक्रांतीत समावेश होतो.)

सर्वसमावेशक शाश्वत ग्रामीण विकास (Inclunsive Sustainable Rural Development) –

आर्थिक सुधारणा काळात कृषी क्षेत्रातील गुंतवणुकीचे प्रमाण कमी झाले. एकूण जी.डी.पी. च्या दोन टक्के गुंतवणुक कृषी क्षेत्रात होतांना दिसते. खाजगी गुंतवणुकीचे प्रमाण कमी असल्याने कृषी विकासाच्या दृष्टीने आवश्यक पायाभूत सोयीच्या विकासाकडे दुर्लक्ष झाले आहे. शेतीतील पायाभूत सोयीत वाढ केल्यास किंवा एकूण पायाभूत सुविधा वाढवत असतांना शेती क्षेत्र दुर्लक्षित राहणार नाही, यांची काळजी घेतल्यास सर्वसमावेशक शाश्वत ग्रामीण विकास निश्चित घडून येईल.

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E- Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) - 0.676 (2013)
Special Issue : Samisha August 2018
UGC Approved No. 40705

सद्यास्थितीत एक महत्वपूर्ण समस्या म्हणजे हवामान बदल, कृषी वनीकरण आणि मासेमारी यासारख्या व्यवसायांवर हवामान बदलाचा विपरीत परिणाम होताना दिसतो. उदरनिर्वाहाचा प्रश्न आज जरी संतूलित असल्यासारखा दिसत असला तरी संतूलितपणा कायम ठेवण्यासाठी हवामान बदलाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. नाही तर भविष्यात उदरनिर्वाहाचा प्रश्न न सुटणार बनु शकतो.

जास्त सर्वसमावेशक शाश्वत ग्रामीण विकासाच्या पूर्ततेसाठी स्थायी व्यूहरचनेची आखणी व प्रभावी अंमलबजावणी होणे नितांत आवश्यक आहे.

**ग्रामीण लोकसंख्या आर्थिक विकासाचा अंतिम स्त्रोत —**

शहरीकरणाने ग्रामीण क्षेत्रावर अन्याय केला, मात्र हे अर्धसत्य आहे. शहरीकरणामुळे काही प्रमाणात ग्रामीण क्षेत्रावर परिणाम होत आहे. म्हणजेच तर काय तर ग्रामीण जनता स्वताहून कधी मुख्य प्रवाहात येण्यासाठी धडपडला नाही. शिक्षण, संशोधक, कला, संस्कृती वैगरे बाबतीत सहभागी होऊन पुढे येण्यासाठी पुरेसा संघर्ष केला नाही. म्हणून ग्रामीण समाज मागास राहण्यास प्रगत पुढारलेला शहरी समाज व मागास ग्रामीण समाज दोन्ही कारणीभूत आहे. भांडवल, तंत्रज्ञान, नैसर्गिक साधनसंपत्ती, चांगले व्यवस्थापन, स्थीर सरकार, बाजारातील अपूर्णता, सामाजिक व आर्थिक समता इत्यादी घटकांचा समावेश आर्थिक विकासात होतो, या सर्व घटकांना क्रियाशील करण्याची ताकद लोकसंख्या या घटकात आहे. ग्रामीण लोकसंख्येतील आकार आणि गुणवत्तेत वाढ झाल्यास आर्थिक विकासाचा अंतिम स्त्रोत ग्रामीण पर्याप्त लोकसंख्या बनणार हे सत्य आहे.

**ग्रामीण क्लिनिक — कृषी विज्ञान केंद्र**

कृषी विज्ञान केंद्राचा मुळ उद्देश उपलब्ध असलेले आधुनिक तंत्रज्ञान व शेती उत्पादन वाढीसाठी त्याचा अवलंब यामध्ये जी दरी आहे ती भरूण काढणे, शेतीची उत्पादकता वाढविणे हा आहे. शेतकऱ्यांच्या जीवनमानाची पातळी उंचावण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र महत्वाची भुमिका पार पाडत आहे.

(अ) तंत्रज्ञानाविषयी प्रक्षेत्र चाचणी (ब) प्रथमदर्शी पिक प्रात्याक्षिके (क) शिक्षण—प्रशिक्षण (ड) माती परिक्षण व पाणी परिक्षण (इ) गृहविज्ञान — गृहविज्ञान विभागामार्फत महिलांना विविध विषयावर प्रशिक्षण दिले जाते त्यामध्ये आरोग्य व अन्नसुरक्षा, पोषण आहार, माता आणि बालसंगोपन, गृहउद्योग व्यवसाय, धान्य साठविण्याच्या प्रक्रियेत होणारे नुकसान कमी करणे यावर भर दिला जातो. (ई) निदान चमू भेटी (ग) एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (ह) पीक संरक्षण (फ) उद्यानविद्या (ल) अन्न तंत्रज्ञान (भ) एकात्मीक किड व्यवस्थापन (न) शेतकरी मेळावे (ट) पर्यटण (ठ) भुमिहिन शेतमजुरांसाठी प्रशिक्षण

अशा विविध कार्यक्रम आणि उपक्रमांच्या माध्यमातून देशातील कृषी विज्ञान केंद्राकडून शेतकरी, महिला शेतकरी, ग्रामीण युवक, युवती यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेती करण्याचे शिक्षण आणि प्रशिक्षण दिले जाते.

बदलत्या हवामानाचा आणि जागतिक आव्हानांचा फटका शेती क्षेत्राला बसत आहे याचा सामना करून शेतकरी व शेती, ग्रामीण उदरनिर्वाह समृध्द करण्यासाठी त्यांच्यामध्ये तशी क्षमता निर्माण करण्याचे कार्य कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून केले जात आहे. जिल्हा स्तरावर कृषी विज्ञान केंद्राचा विस्तार केला आहे. निरसंकोचपणे यामार्फत आगामी ग्रामीण उदरनिर्वाह मजबूत होईल.

**ग्रामीण धोक्याच्या व्यवस्थापनाकडे लक्ष —**

दशकानुदशके केलेला विकास एखादी आपत्ती क्षणार्धात फस्त करून टाकते. दुसरे म्हणजे विकासाचा अभाव कमकुवत समाजाला आपत्तीच्या धोक्यात जखडून टाकतो. तिसरे म्हणजे

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E- Research Journal ISSN :
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) - 0.676 (2013) 2348-7143
Special Issue Samisha August
UGC Approved No. 40705 2018

विकास आपत्तीच्या नव्या धोक्यांना जन्म देतो म्हणजेच आपत्ती आणि विकास याचा त्रिमितीय संबंध आहे.

ग्रामीण विकासातील धोक्यांना आणि अनिश्चितांना तोंड देतांना चांगले व्यवस्थापन निर्माण करणे आवश्यक आहे. उद्योग व सेवा क्षेत्रातील अनिश्चितांचा थोडा अंदाज घेता येतो परंतु तुलनेत कृषी क्षेत्रातील अनिश्चितता बऱ्हाच व्यापक व कठीण आहे.

ग्रामीण विकासाचा प्रवाह मोठा करीत असतांना धोक्याकडे, आपत्तीकडे आणि अनिश्चितांकडे ''गाडी चालवत असतांना आरशाकडे सदैव लक्ष ज्याप्रमाणे आपण ठेवतो त्याप्रमाणे लक्ष ठेवणे गरजेचे आहे.'' यासाठी परंपरागत आणि शास्त्रीय ज्ञानाच्या चष्म्याचा वापर आवश्यक आहे थोडक्यात धोक्याचे प्रमाण कमी राखणे हा ग्रामीण आपत्ती व्यवस्थापनातील प्रमुख कार्यक्रम आहे.

## समारोप

भारतीय गावांची समृध्दी कृषी आधारीत उद्योगांच्या माध्यमातूनच शक्य आहे बोजेंद्रनाथ बॅनर्जी यांनी विकसीत, औद्योगीक देशांच्या अनुभवावरून असे मत मांडले की, ''देशाच्या एकूण विकासात ग्रामीण व ग्रामीण विकासात कृषी उद्योग महत्वाचे आहेत.'' कृषीक्षेत्र व औद्योगीक क्षेत्र एकमेकांचे प्रतिस्थापन करू शकत नाही. त्यामुळे सर्व क्षेत्र ऐकमेकांना पुरक आहेत म्हणून तिन्ही क्षेत्राचा एकाच वेळी विचार करून ग्रामीण विकास साधने गरजेचे आहे.

विकसीत औद्योगिक देशांनी कृषी क्षेत्रात निर्माण होणाऱ्या फळे, भाजीपाला यांच्यावर प्रक्रीया करून त्यांचा टिकावुपणा वाढवून कृषी विकासासोबत आर्थिक विकास साधला आहे.

जगातील अनेक विकसनशील देशांनी ग्रामीण विकासासाठी कृषी आधारीत उद्योगांना प्राधान्य दिले आहे. वाढत्या उत्पादकतेचा वापर करण्यासाठी भारतात स्थानिक विविधीकरणाला गती मिळत आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

ग्रामीण दारीद्रय, बेरोजगारी, आर्थिक विषमता, महागाईचा प्रश्न मिटवण्यासाठी ग्रामीण प्रभावी मागणीत वाढ होणे गरजेचे आहे. ग्रामीण विकासातील शेती आधारीत उद्योगांचे महत्व आणि समस्या ओळखुन सरकारमार्फत गुंतवणूक वाढल्यास ग्रामीण लोकांच्या प्रभावी मागणीत वाढ होऊन इतर क्षेत्राच्या प्रभावी मागणीला उत्तेजन मिळणार आहे थोडक्यात कृषी आधारीत उद्योगांना प्राधान्य दिल्यास ग्रामीण विकासाचे प्रभावी मागणी हे महत्वपूर्ण साधन बनणार आहे केन्सनी सांगितलेला प्रभावी मागणीचा उपाय विकसनशील देशात कृषी व ग्रामीण क्षेत्रात वापरणे खूप खूप गरजेचे आहे. सर्वसमावेशक व शाश्वत विकास यामुळेच साध्य होईल.

**संदर्भग्रंथ –**

१) भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) — डॉ.विनायक देशपांडे
२) अर्थसंवाद, खंड ३९, अंक १
३) कुरूक्षेत्र - जानेवारी २०१७